महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# नेटवर्क्स

Oct 29, 2012, 12.00AM IST

संकलन - नीरज पंडित

हजारो वेबसाइट्स...सतत चालणारं सर्चिंग-सर्फिंग...चुटकीसरशी मिळणारी माहिती...यातून माहितीचा अमर्याद खजिना लोकांसमोर खुला होतो. माहितीच्या महाजालाने प्रत्येक क्षेत्राला खूप काही दिलं आहे. आज , सोमवारी असलेल्या इंटरनेट डेच्या निमित्ताने , नेटने आपल्याला काय दिलं हे सांगतायत वेगवेगळया क्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी.

क्षेत्र - एंटरटेनमेंट

बिझनेस वाढला

मनोरंजन क्षेत्राला इंटरनेटने काय दिलं असं म्हणायचं की , इंटरनेटने मनोरंजन क्षेत्राला काय दिलं असं म्हणायचं ? या दोन्ही वाक्यांतून परस्परातली देवाण-घेवाणच दिसून येते. एंटरटेनमेंटमुळे इंटरनेटची शक्ती वाढली. तर इंटरनेटमुळे एंटरटेनमेंट घराघरापर्यंत पोहोचलं. यु ट्यूबच्या माध्यमातून नव्या सिनेमांचे ट्रेलर्स लोकांपर्यंत पोहोचू लागले. लोकांच्या थेट कमेंट्सही इथे येऊ लागल्या. याचबरोबर सर्वात महत्त्वाची गोष्ट घडली ती या माध्यमामुळे एंटरटेनमेंटचा व्यवसाय वाढला. या माध्यमाचा सर्वाधिक फायदा झाला तो म्हणजे आम्ही एकाचवेळी जगभरात पोहोचू लागलो. पण आपल्याकडे इंटरनेटचा दर्जा अद्याप खालावलेलाच आहे.

अमेय हेटे , एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर , व्हॅल्यूएबल ग्रुप

क्षेत्र - मराठी साहित्य

मराठीला ग्लोबल केलं

साहित्य क्षेत्राला इंटरनेटमुळे सर्वात मोठा फायदा काय झाला असेल तर तो म्हणजे पुस्तकं जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. छापील पुस्तकांची जागा ई-बुक्स घेऊ लागली आहेत. मराठीचं भवितव्य काय ? अशी अवस्था होत असताना मराठीला जागतिक पातळीवर पोहोचवण्याचं महत्त्वाचं काम इंटरनेटने केलं आहे. याचा परिणाम असा झाला की , अमेरिकेतल्या अनेक संशोधकांनी मराठीवर संशोधन करून पीएचडी मिळवली आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे परदेशात जन्म झालेल्या आणि तिथेच वाढत असलेल्या मराठी मुलांना मराठी भाषेची आणि साहित्याची ओळख होतेय ती केवळ याच माध्यमातून.

मंदार जोगळेकर , संस्थापक , बुकगंगा डॉट कॉम

क्षेत्र - कॉमर्स

फक्त एका क्लिकवर

इंटरनेटमुळे जग एका क्लिकवर आलं याचा अनुभव उद्योजकाला मोठ्या प्रमाणावर येतोय. पूर्वी आम्हाला व्यवसायानिमित्त वारंवार परदेश दौऱ्यावर जावं लागत होतं. मात्र आता आम्ही मुंबईतल्या ऑफिसमध्ये बसून जगातल्या कोणत्याही ऑफिसवर लक्ष ठेऊ शकतो. यामुळे उद्योजक कम्युनिकेशन करत कमिटेड होऊ शकले. याचबरोबर आणखी एक फायदा झाला तो म्हणजे ई-कॉमर्स आणि ऑनलाइन ट्रेडिंगचा. हे व्यवहार करणं इंटरनेटमुळं खूप सोपं झालं आहे. अगदी शेतकऱ्यांपर्यंत इंटरनेट पोहोचल्यामुळे त्यांना रोजचे ताजे बाजारभाव कळू लागले आहेत. पण यात एक सांगावसं वाटतं ते म्हणजे सरकारने याकडे नीट लक्ष दिलं तर हे व्यवहार अधिक वाढतील. याचा फायदा अखेर देशाच्या विकासासाठीच होणार आहे.
वेणुगोपाल धूत , प्रमुख , व्हीडिओकॉन ग्रुप

क्षेत्र - क्रीडा

खेळ घराघरात पोहोचले

खेळाच्याबाबतीत सर्वात महत्त्वाची गोष्ट इंटरनेटमुळे अशी झाली ती म्हणजे विविध क्रीडाप्रकार घराघरात पोहाचले. अनेक लोकांना याची माहिती मिळत गेली. यामुळे हे खेळ ग्लोबलाइज्ड झाले आहेत. क्रिकेट व्यतिरिक्त फॉर्म्युला वन , ऑलिम्पिक्स गेम्स , फुटबॉल अशा गेम्सबाबतचीही क्रेझ मुलांमध्ये निर्माण होऊ लागली आहे. त्यांना त्यांच्या आवडत्या क्रीडापटूंची अतिरिक्त माहिती मिळू लागली. त्याच्या आवडत्या खेळाबाबतचे लेटेस्ट अपडेट्सही मिळू लागले. याचबरोबर एखाद्या मनोरंजक सामन्याचे आपल्या सवडीनुसार व्हिडीओ पाहण्याची सुविधाही मुलांना केवळ इंटरनेटमुळेच मिळू शकली आहे.
नीलेश कुलकर्णी , माजी क्रिकेटपटू

क्षेत्र - शिक्षण

दर्जात्मक शिक्षणाकडे

इंटरनेटचा सर्वाधिक फायदा कोणत्या क्षेत्राला झाला असेल तर तो शिक्षणाला. इथं ज्ञानाचं मोठ भांडार एकत्रित आलं आहे. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांनाही याचा खूप मोठा फायदा झाला आहे. ई-लर्निंग या संकल्पनेतून शिक्षण पद्धती अधिक सोपी आणि विद्यार्थीकेंद्रीत होऊ लागली आहे. यामुळे शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. शिक्षणपद्धतीचा दर्जा वाढू लागला आहे. याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट झाली ती म्हणजे संशोधनासाठी पूर्वी संदर्भ शोधणं हे खूप जिकीरीचं व्हायचं ते आता अधिक सोपं झालं आहे.

डॉ. कविता लघाटे , डायरेक्टर , बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट